आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ जानेवारी २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारच्या प्रगती व्यासपीठामुळं ८५ लाख कोटी रुपयांच्या सव्वा ३ हजारांहून अधिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या गतीमध्ये वाढ

- महाराष्ट्रासह ८ राज्यात सेमीकंडक्टर प्रकल्पाचे २२ प्रस्ताव मंजूर

- निर्यातदारांना कर्ज सुविधा मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडून सव्वा ७ हजार कोटींचे पॅकेज जाहीर

**आणि**

- मराठी भाषा तसंच जाती धर्म यांची सरमिसळ न करण्याचं आवाहन संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांचं आवाहन

**<><><><><>**

केंद्र सरकारनं सुरू केलेल्या प्रगती व्यासपीठामुळं ८५ लाख कोटी रुपयांच्या रकमेचे सव्वा ३ हजारांहून अधिक प्रकल्पांची गती वाढली. विविध ६१ सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवर यातून लक्ष दिलं जात असल्याची माहिती कॅबिनेट सचिव टी व्ही सोमनाथन यांनी आज नवी दिल्लीत दिली. या व्यासपीठाचा आढावा घेतल्यानंतर आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. केंद्र आणि राज्य सरकारांमधला समन्वय वाढवून महत्वाच्या प्रकल्पांमधले अडथळे दूर करण्यासाठी याची सुरुवात झाली होती.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स वस्तू उत्पादन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात केंद्र सरकारने  २२ नवीन प्रस्ताव  मंजूर केले आहे. नवीन वर्षात देशामध्ये ४ नवे सेमिकंडक्टर उत्पादन प्रकल्प सुरु होत असल्याची घोषणा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान

मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. यासंबंधात नवी दिल्लीत आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आज ते बोलत होते.  याच्या आधीही सरकारने २४ प्रकल्पांना मंजुरी दिली होती. या प्रकल्पांमध्ये ४१ हजार ८६३ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून मोबाईल उत्पादन, दूरसंचार, ग्राहकोपयोगी आणि लष्करी उपयोगाचं इलेक्ट्रॉनिक्स, तसंच माहिती तंत्रज्ञान संबंधित यंत्रसामुग्री उत्पादनाचा यात समावेश आहे. हे प्रकल्प महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हरयाणा, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये सुरु होणार असून यामधून सुमारे ३४ हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><>**

निर्यातदारांना कर्ज सुविधा सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारनं आज ७ हजार २९५ कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं. त्यात ५ हजार १८१ कोटी रुपये व्याज अनुदान, तर २ हजार ११४ कोटी रुपये कर्ज हमी स्वरुपात दिले जाणार आहेत. ही योजना सहा वर्षांसाठी आहे. यामुळे निर्यातदारांच्या वित्त समस्यांचं निराकरण होईल, असं केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाचे अतिरिक्त सचीव अजय भादू यांनी सांगितलं.

**<><><><>**

बदलत्या हवामानामुळं होणारं  पिकांचं  नुकसान टाळता यावं, यासाठी कृषी विभाग  विकसित बियाणांचे वाण तयार करणार असल्याचं,  केंद्रीय कृषी व ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान आज नाशिक इथं म्हणाले. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा,  यासाठी कृषी  उत्पादनांचे  प्रमाणीकरण करणारी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे, अशी माहितीही चौहान यांनी यावेळी दिली.

**<><><><>**

महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत आज संपली. आता ठिकठिकाणच्या लढतींचं चित्र स्पष्ट होईल. अनेक ठिकाणी उमेदवारांना प्रतिस्पर्धी न उरल्यानं त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी मुळातच एकमेव अर्ज आले होते, तर काही ठिकाणी छाननीत इतर अर्ज बाद झाल्यानं उमेदवार बिनविरोध आहेत. उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल.

दरम्यान, उमेदवारी मागे घेण्यासाठी उमेदवारांना दबाव, प्रलोभन किंवा जबरदस्तीला बळी पडावं लागलेलं नाही, याची खात्री करून घ्यावी आणि तसा अहवाल सादर करावा, असे निर्देश निवडणूक आयोगानं संबंधित महानगर पालिकांना दिले आहेत.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीनं आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी आज मुंबईत शिवसेना भवनात मुंबईच्या विकासाचा वचननामा उमेदवारांसमोर सादर केला. यावेळी त्यांनी मुंबईकरांसाठी विविध योजना आणि प्रकल्पांच्या घोषणा केल्या. त्यात १०० युनिटपर्यंत मोफत वीज, घरकाम करणाऱ्या महिला आणि कोळी महिलांसाठी १५०० रुपयांचा स्वाभिमान निधी, ७०० चौरस फुटा पर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी यासारख्या घोषणांचा समावेश आहे. तपशीलवार निवडणूक जाहीरनामा येत्या दोन-तीन दिवसात जाहीर करु, असं आदित्य ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठी भाषा आणि जाती धर्म यांची सरमिसळ न करण्याचं आवाहन संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांनी आज केलं. साताऱ्यात ९९ व्या अखिल भारतीय

मराठी साहित्य संमेलनाच्या औपचारिक उद्घाटनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्ष पदाची सूत्रं ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी मावळत्या अध्यक्ष डॉ तारा भवाळकर यांच्याकडून स्वीकारली.

**बाईट विश्वास पाटील**

ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग प्रमुख पाहुण्या होत्या. सर्वात पहिल्यांदा मराठीत दलित साहित्य लिहिण्यात आले. दलित साहित्य हा मराठी साहित्यविश्वाचा आत्मा असल्याची भावना त्यांनी उद्घाटनपर भाषणात व्यक्त केली.

ग्रामीण भागातल्या प्रकाशक आणि लेखकांना प्रोत्साहन देण्याची भूमिका मावळत्या अध्यक्ष डॉ. भवाळकर यांनी मांडली. पहिलीपासून हिंदी किंवा अन्य भारतीय भाषा शिकवण्याच्या निर्णयाला साहित्यिक जगताचा विरोध असल्याचंही त्या म्हणाल्या.

मुख्यमंत्री असताना मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन दिली. साहित्यिकांनी राजकारणात यावे; मात्र साहित्य क्षेत्रात राजकारण आणू नये, असं ते म्हणाले. साहित्य जनजीवनाचं दर्शन घडवतं आणि समाजाला वळण लावतं. त्यामुळे संमेलनाच्या मंचावरुन झालेली टीका महत्त्वाची असते,  असं त्यांनी सांगितलं.

**बाईट- मुख्यमंत्री**

राज्यात केवळ मराठी भाषाच सक्तीची राहील, हिंदी किंवा इतर भाषा शाळेत शिकवण्याबाबत नरेंद्र जाधव समितीच्या अहवालानंतरच निर्णय घेऊ असं ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या वर्षभरात भारताने वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रात निर्णायक टप्पे गाठले. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टरपासून ते अंतराळ संशोधन, अणुउर्जा,

खनिज क्षेत्रात भारताने प्रगती केली. तांत्रिक आत्मनिर्भरता हे या वर्षाचं धोरण ठरलं असून विकसित भारताच्या दिशेनं टाकलेलं ते एक महत्त्वाचं पाऊल म्हणावं लागेल. या विषयी सविस्तर माहिती आता ऐकुया...

-------------------व्हीसी---------------------

गेल्या वर्षभरात इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर क्षेत्रात झालेल्या प्रगतीला आणखी मजबुती देण्यासाठी आणि दुर्मिळ अशा खनिजांच्या क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी केंद्र सरकारने खनिज अभियानाची सुरुवात केली. या मोहिमेअंतर्गत खनिजांचा देशांतर्गत पुरवठा मजबूत करून खनिजांच्या पुरवठ्यावर वर्चस्व असलेल्या देशांवरचं भारताचं अवलंबित्व कमी झालं. भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने गेल्यावर्षी १९५ खनिज शोध प्रकल्प हाती घेतले. तसंच लिथियम, कोबाल्ट, निकेल आणि दुर्मिळ खनिजांच्या पुनर्वापरासाठी देशांतर्गत क्षमता विकसित व्हावी याकरता दीड हजार कोटी रुपयांच्या पुनर्वापर योजनेलाही मंजुरी मिळाली. या वर्षात भारतासाठी अंतराळ संशोधन हे क्षेत्र अतिशय महत्त्वाचं आणि निर्णायक ठरलं. जुलै महिन्यात भारताने नासा आणि इस्रोच्या सिंथेटिक अपार्चर रडार अर्थात निसारचं यशस्वी प्रक्षेपण केलं. तसंच, भारताच्या मानवी अंतराळ उड्डाणाचा ऐतिहासिक टप्पा गाठला. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर प्रवास करणारे पहिले भारतीय ठरले. ॲक्सिओम फोर या अंतराळ मोहिमेत त्यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर १८ दिवस राहून विविध वैज्ञानिक प्रयोग आणि संशोधन केलं. इस्रोच्या स्पेडएक्स या मोहिमेअंतर्गत अंतराळात उपग्रह जोडणी आणि विलगीकरण करणारा भारत जगातला चौथा देश बनला. हे वर्षं भारताच्या अणुउर्जा क्षेत्रासाठीही महत्त्वाचं ठरलं. केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या शांती या अणुउर्जा कायद्यामुळे अणुउर्जा क्षेत्रात खासगी सहभागाचे दरवाजे खुले झाले आहेत.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँक पाचशे रुपयांच्या नोटा चलनातून बाद करणार आहे, या वृत्ताचं केंद्र सरकारनं खंडन केलं आहे. येत्या मार्चपासून या नोटा बंद होणार असल्याची बातमी समाज माध्यमांवर फिरत आहे, ती निराधार असून असा कोणताही विचार नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**//<><><><><>//**